# माझे 'तायची वॉक' (खरी घटना)

मी ‘यू ट्यूब’  वर हृदयाची ताकद वाढवण्यासाठी काही उपाय शोधत होते.

त्याच वेळी तिथे 'तायची वॉक'ची (Tai Chi Walk) एक जाहिरात दिसली. काही प्रश्नांची उत्तरे दिली. ह्या प्रक्रियेला साधारण दहा मिनिटे लागली, मी आणखी काही मिनिटे त्या संदेशाकडे पाहत राहिले: "कृपया प्रतीक्षा करा, आम्ही तुमच्यासाठी एक परिपूर्ण कार्यक्रम  व  वेळापत्रक तयार करत आहोत." मी ते वाक्य पुन्हा पुन्हा वाचले—आधी पूर्ण शब्द म्हणून आणि नंतर अक्षर-अक्षर  म्हणून. मला वाटू लागले की कदाचित माझे डिव्हाइसच बंद पडले आहे. तितक्यात, स्क्रीनवरील दृश्य बदलले.

'अभिनंदन'—तुमच्या 'तायची वॉक' (Tai Chi walk) कार्यक्रमाचे सचित्र वेळापत्रक तयार आहे. ते डाउनलोड करण्यासाठी फक्त $९.९९ भरा (हे ॲक्सेस २८ दिवसांसाठी वैध असेल).

मी खर्चाचा हिशोब केला—एका महिन्याच्या प्रशिक्षणासाठी ₹९५०—आणि तो मला वाजवी वाटला. मी क्रेडिट कार्डद्वारे पैसे भरण्याचा प्रयत्न केला, पण "invalid card" (अवैध कार्ड) असा संदेश आला. म्हणून मी डेबिट कार्ड वापरून पैसे भरले; तेव्हा मला बँकेकडून दोन संदेश आले.

१. तुमच्या खात्यातून रक्कम वजा करण्यात आली आहे.

इथ  पर्यंत सर्व काही ठीक होते. त्यानंतर मी व्हॉट्स  ॲप आणि जी-मेल तपासले, पण लॉगिन आयडीबाबत कोणताही संदेश आला नव्हता. पुढे काय करावे याचा विचार करत असतानाच, बँकेकडून दुसरा संदेश आला—आणि त्या संदेशामुळे मी अस्वस्थ झाले.

तो दुसरा संदेश खालील  प्रमाणे होता:

२. 'xyz' या कंपनीला तुमच्या ९९९९ ने शेवट होणाऱ्या डेबिट कार्डद्वारे १५,००० रुपयांची रक्कम दिली जाईल. हे ई-मँडेट (e-mandate) ०१.०२.२०३२ पर्यंत वैध राहील.

मला धक्काच बसला. मला केवळ एकदाच पैसे भरायचे होते, पण त्या कंपनीने मला पुढील सहा वर्षे लुटण्यासाठी एक सापळा रचला होता. ही फसवणूक टाळण्यासाठी मी घाईघाईने,   एखाद्या 'तायची' पद्धतीसारखी चालत—बँकेत गेले. तिथे चौकशी केल्यावर मला समजले की, अजून कोणतीही इलेक्ट्रॉनिक सूचना जारी झाली नव्हती; मी देवाचे आभार मानले. मी ते कार्ड रद्द केले आणि त्या खात्यातील सर्व रक्कम दुसऱ्या खात्यात वर्ग केली.

त्यानंतर, मी सुटकेचा नि:श्वास टाकत घरी परतले. त्या सर्व धावपळीत अवघ्या एका तासात माझे अर्धा किलो वजन कमी झाले होते—आणि मला माझ्या हृदयाची खरी क्षमता कळून आली.

एक नम्र विनंती: "जर एखादी गोष्ट महत्त्वाची वाटत असेल, पण तिचा स्रोत अज्ञात असेल, तर ती टाळणेच उत्तम."

इंटरनेट म्हणते, "मी जीवनाची मूल्ये शिकवत नाही, पण मी शिकण्याचे मार्ग—आणि छुपी चोरी करण्याचे मार्ग—नक्कीच उघड करतो."

शेवटी शुभेच्छा: वेबवरील तुमचा प्रत्येक प्रवास सुरक्षित आणि सुखद होवो...